नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

दैनिक
यश सिद्धि न्यूज
संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - ४ थे Year - 4rd | अंक - १७३ Issue - 173 | वार - शुक्रवार दि. २० नोव्हेंबर २०२६ Blow- Friday Date 20 NOVEMBER 2026 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amout - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

स्वदेशी आणि आत्मनिर्भरतेचा विचार घराघरांत न्या

'फिक्की'च्या संमेलनात पंतप्रधान मोदी यांचे उद्योजकांना स्पष्ट आवाहन



दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

नवी दिल्ली : महात्मा गांधी यांनी १९३० मध्ये देशाला स्वदेशी वस्तूंचा वापर आणि आत्मनिर्भरतेचा जो मूलमंत्र दिला होता, तोच संदेश आज शंभर वर्षांनंतरही पुढे नेण्याची गरज असल्याचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गुरुवारी स्पष्ट केले. नवी दिल्लीतील 'भारत मंडपम' येथे आयोजित 'फिक्की'च्या वार्षिक सर्वसाधारण सभेत आणि संमेलनात ते बोलत होते. यावेळी त्यांनी 'आत्मनिर्भर भारत' ही संकल्पना केवळ भाषणापुरती न ठेवता ती देशातील प्रत्येक घरापर्यंत पोहोचवण्याचे आवाहन उद्योग जगताला केले.

उद्योगपतींशी थेट संवाद साधताना पंतप्रधान मोदी म्हणाले की, विचार करा, आज शंभर वर्षे उलटून गेली तरी गांधीजींनी १९३० मध्ये दिलेला संदेश मला पुन्हा सांगावा लागत आहे. हे आपल्या यशाचे लक्षण मानायचे की अपयशाचे? माझे ऐकू नका, पण निदान गांधीजींचे तरी ऐकायला हवे होते! त्यांनीही स्वदेशी आणि आत्मनिर्भर भारताचीच भूमिका मांडली होती. आता फिक्कीलाही शंभर वर्षे पूर्ण होत आहेत, तरीही आपण तिथेच आहोत. माझा हा संदेश प्रत्येक घराघरांत पोहोचावा.

पूर्वीच्या सरकारांचा संदर्भ देत पंतप्रधान म्हणाले की, मागील सरकारांच्या काळात उद्योग जगताला आलेले अनुभव इतके कडू होते की, त्याचा परिणाम आजच्या सरकारसोबतच्या संबंधांवरही दिसून येतो. जुन्या सरकारांचे कटू अनुभव आज मला सहन करावे लागत आहेत. मात्र, हे पूर्वीसारखे सरकार नसून मित्रांचे सरकार आहे. या सरकारला मैत्री कशी जपायची हे ठाऊक आहे आणि तुम्ही सर्व माझे खरे मित्र आहात. त्यामुळे कोणताही संकोच किंवा भीती न ठेवता, अजून काय सुधारणा करायला हव्यात याबद्दल मला थेट आणि मोकळेपणाने पत्र लिहा, असे आश्वासन मोदींनी दिले.

औषध निर्मिती (फार्मा) क्षेत्रातील उद्योजकांना मार्गदर्शन करताना पंतप्रधानांनी परदेशातून आयात होणाऱ्या कच्च्या मालावरील (झखी आणि बल्क ड्रग्स) अवलंबित्व कमी करण्यावर भर दिला. भारत 'जगाची फार्मसी' म्हणून ओळखला जात असला, तरी आपण दरवर्षी अब्जावधी डॉलर्सचा कच्चा माल बाहेरून आयात करतो, याकडे त्यांनी लक्ष वेधले. अनेक क्षेत्रांमध्ये आपण आजही आयातीवर अवलंबून आहोत. आपल्या फार्मा उद्योगाने कोणते घटक देशातच तयार करणे शक्य आहे, याचा अभ्यास करावा. जागतिक बाजारपेठेत टिकून राहण्यासाठी नवीन तंत्रज्ञान आणि मोठ्या उत्पादन प्रकल्पांमध्ये कुठे गुंतवणूक करता येईल, याचा विचार करावा, असे त्यांनी सांगितले. कृषी क्षेत्राबाबत बोलताना मोदींनी उद्योगांना शेतीत अधिक गुंतवणूक करण्याचा आणि परदेशातील मागणीनुसार उत्पादने तयार करण्याचा सल्ला दिला. परदेशातील विशिष्ट बाजारपेठा लक्षात घेऊन शेतमाल खरेदीची मजबूत व विश्वासार्ह साखळी उभारावी, जेणेकरून भारतीय उत्पादने हीच जगभरात भारताची ओळख बनतील, असे त्यांनी स्पष्ट केले.

केंद्र सरकारच्या करविषयक निर्णयांची माहिती देताना मोदी म्हणाले की, २०१४ मध्ये कॉर्पोरेट कराचा मूळ दर ३० टक्के होता, तो कमी करून २२ टक्के करण्यात आला. सध्या १२ लाख रुपयांपर्यंतचे उत्पन्न करमुक्त केले आहे. या सवलतींचा लाभ घेत उद्योजकांनी कर्मचाऱ्यांचे पगार वाढवले का किंवा नवीन रोजगार निर्माण केले का, असा सवालही त्यांनी केला. पूर्वी कर परतावा (रिफंड) मिळायला आठ महिने लागत असत; मात्र आता प्रक्रिया सोपी केल्यामुळे केवळ एका आठवड्यात परताव्याची रक्कम मिळते, असे त्यांनी सांगितले.

भारताच्या आर्थिक प्रगतीचा उल्लेख करत पंतप्रधान म्हणाले की, आज भारत जगातील सर्वात वेगाने वाढणारी मोठी अर्थव्यवस्था असून विकास दर सुमारे ७ टक्क्यांच्या आसपास राहण्याचा अंदाज आहे. ऑक्टोबर महिन्यात भारताची वस्तू निर्यात जवळपास ५० अब्ज डॉलर्सपर्यंत पोहोचली असून, हा आतापर्यंतचा एका महिन्यातील सर्वोत्तम विक्रम आहे. भारताच्या या भक्कम आर्थिक कामगिरीमुळेच 'मूडीज', 'एस अँड पी', 'फिच', जागतिक बँक आणि आशियाई विकास बँक यांसारख्या आंतरराष्ट्रीय संस्था भारताच्या विकास दराचा अंदाज वाढवून सांगत असल्याचे त्यांनी नमूद केले. कर सुधारणा आणि उद्योजकांच्या सन्मानाचा मुद्दा मांडताना पंतप्रधान म्हणाले की, कोणताही देश शेतकरी, छोटे उद्योजक, संपत्ती निर्माण करणारे आणि करदाते यांना सतत दोष देऊन किंवा हिणवून पुढे जात नाही, तर त्यांचा सन्मान करूनच प्रगती करतो. २००१-०२ मध्ये गुजरातचे मुख्यमंत्री झाल्यानंतर आयकर विभागाच्या एका कार्यक्रमात प्रत्येकाकडे 'चोर' म्हणून पाहण्याची वृत्ती कधी बदलणार, असा प्रश्न आपण विचारला होता, ही आठवणही त्यांनी यावेळी जागवली.

एकाच कुटुंबातील ५ जणांच्या बॉडी विहिरीत सापडल्या; माहेरी आलेल्या लेकीचा आई, वडील अन् मुलांसह शेवट

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

चेन्नई: एका विहिरीत पाच जणांचे निष्प्राण देह सापडले आहेत. पाचही जण एकाच कुटुंबातील होते. पती, पत्नी आणि त्यांची मुलगी आणि तिच्या दोन मुलांचा मृतांमध्ये समावेश आहे. कुटुंबाच्या शेतातील विहिरीत तिघांचे मृतदेह सापडले. ग्रामस्थांनी बुधवारी संध्याकाळी विहिरीत शव पाहिले. त्यांनी याची माहिती पोलिसांना दिली. यानंतर पोलिसांनी घटनास्थळ गाठत तपास सुरू केला. तामिळनाडूच्या करुर जिल्ह्यात ही घटना घडली.

दाम्पत्याची ३५ वर्षीय लेक सुगुना पती सोबतच्या वादानंतर तिच्या २ मुलांना घेऊन माहेरी राहात होती. १५ नोव्हेंबरलाच ती आई, वडिलांच्या घरी आली होती. त्यानंतर तीनच दिवसांनी कुटुंबातील पाचही सदस्यांचे मृतदेह विहिरीत सापडले. यानंतर परिसरात एकच खळबळ उडाली.



पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सुगुनाचा विवाह १३ वर्षांपूर्वी प्रभूशी झाला होता. प्रभू वेलायुथमपलायमचा रहिवासी आहे. प्रभू आणि सुगुना यांना दोन मुलं होती. १० वर्षांची शिवानी आणि ४ वर्षांचा अधिरन अशी त्यांची नावं आहेत. सुगुना आणि प्रभू यांच्यात वाद सुरू होता. वाद टोकाला गेल्यानं सुगुना १५ नोव्हेंबरला तिच्या दोन्ही मुलांसह माहेरी गेली. करुर जिल्ह्यातील वेंगमेडू परिसरामधील कोंगू नगरात सुगुनाचे आई, वडील राहतात. तीन दिवसांपासून सुगुना आणि तिची मुलं त्यांच्या घरी वास्तव्यास होती.

बुधवारी संध्याकाळी चिनाकलियापालयम गावातील काही जणांनी शेतातील विहिरीत डोकावून पाहिलं. तेव्हा त्यात पाच जणांचे मृतदेह दिसले. ते रामासामी आणि जानकी यांच्या कुटुंबाचे असल्याची माहिती समोर आली. त्यानंतर शेजाऱ्यांनी पोलिसांना कळवलं. काही वेळात वंगल पोलीस ठाण्याचे कर्मचारी तिथे पोहोचले. त्यानंतर विहिरीतून पाच शव बाहेकर काढण्यात आले. सर्व मृतांची आळख पटली आहे. रामासामी (६३), त्यांची पत्नी जानकी (६०), त्यांची मुलगी सुगुना (३५) सुगुनाची मुलगी शिवानी (१०) आणि मुलगा अथिरन (४) अशी मृतांची नावं आहेत.

कौटुंबिक वादाचा पाच जणांच्या मृत्यूशी काही संबंध आहे का, याचा शोध पोलीस घेत आहेत. सुगुना आणि तिचा पती यांच्यात वाद होता. याच वादातून पाच जणांचा जीव गेला का, याचा तपास करत आहेत.

दुष्काळी तालुक्यांत अनावश्यक बांधकामांना स्थगिती

मुंबई : राज्यातील ३१० दुष्काळग्रस्त तालुक्यांमध्ये निर्माण झालेल्या टंचाईसदृश परिस्थितीवर मात करण्यासाठी राज्य सरकारने जिल्हा वार्षिक योजनेतील निधीच्या वापराबाबत महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. पिण्याचे पाणी, पशुधनासाठी पाणी व चारा, जलस्रोतांचे बळकटीकरण आणि अत्यावश्यक स्वच्छतेच्या कामांना प्राधान्य देण्याचे निर्देश नियोजन विभागाने दिले आहेत. त्याचवेळी पाण्याचा मोठ्या प्रमाणावर वापर होणारी आणि टंचाई निवारणासाठी अत्यावश्यक नसलेली नवीन बांधकामे दुष्काळाची घोषणा लागू असेपर्यंत तात्पुरती स्थगित करण्याचे आदेश जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आले आहेत. त्यानुसार उद्याने, सुशोभीकरण, नवीन प्रशासकीय इमारती, सिमेंट रस्ते आणि गटारांच्या कामांचाही आढावा घेतला जाणार आहे. गुरुवारी यासंदर्भातील शासन निर्णय जारी करण्यात आला.

या निर्णयानुसार, टंचाईग्रस्त गावांपर्यंत उपलब्ध जलस्रोतांमधील पाणी पोहोचविण्यासाठी अपूर्ण जलवाहिन्या, पंप, विद्युत जोडण्या, साठवण टाक्या आणि वितरण यंत्रणा पूर्ण करता येणार आहेत. दोष दायित्व कालावधी संपलेल्या पाणीपुरवठा योजनांमधील नादुरुस्त घटकांची दुरुस्ती, पाण्याची गळती रोखणे आणि उपलब्ध जलस्रोतांची टंचाईग्रस्त भागांशी जोडणी करण्यावर भर दिला जाणार आहे. कमी निधीअभावी अपूर्ण राहिलेली आणि अल्पावधीत पूर्ण होऊ शकणारी कामेही प्राधान्याने हाती घेता येतील. दुष्काळग्रस्त ३०४ तालुक्यांतील जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत सुरू असलेल्या पाणीपुरवठा योजना पूर्ण करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

पिण्याच्या पाण्याचे विद्यमान स्रोत बळकट करणे, त्यांचा सुरक्षित आणि कार्यक्षम वापर करणे, जलसंधारण व सिंचनाच्या माध्यमातून टंचाई निवारणाला मदत करणारी कामे पूर्ण करणे, तसेच नवीन जलस्रोत निर्माण करून पाण्याची साठवण क्षमता वाढविण्यालाही प्राधान्य दिले जाणार आहे. पशुधनासाठी पाणी आणि चारा उपलब्ध करून देण्याच्या उपाययोजना, सार्वजनिक आरोग्य, अत्यावश्यक स्वच्छता आणि उपजीविकेशी संबंधित कामांचाही यात समावेश आहे. नगरपालिका व नगरपंचायत क्षेत्रांमध्ये ३१ मार्च २०२७ पूर्वी पूर्ण होऊ शकणारे जलशुद्धीकरण प्रकल्प (डब्ल्यूटीपी), सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प (एसटीपी), सांडपाण्याचा पुनर्वापर, सौर ऊर्जा प्रकल्प, जलप्रदूषण प्रतिबंधक आणि घनकचरा व्यवस्थापनाची अत्यावश्यक कामेही करता येणार आहेत.

दुसरीकडे, टंचाई काळात पाण्याचा मोठ्या प्रमाणावर वापर होणारी आणि तातडीने आवश्यक नसलेली नवीन कामे स्थगित करण्याबाबत जिल्हाधिकाऱ्यांना निर्देश देण्यात आले आहेत. नवीन उद्याने, सुशोभीकरण, कार्यालयीन व प्रशासकीय इमारती, ग्रामीण आणि इतर जिल्हा मार्गांवरील सिमेंट रस्ते, मोठ्या ग्रामपंचायत योजनांमधील (पान २ वर...)

जिल्हा प्रशासनाने कार्तिकी वारीचे नियोजन चांगले केलेले असून सर्व विभागांनी परस्परात समन्वय ठेवून वारी यशस्वी करावी

यात्रा कालावधीत भाविकांना दहा लाख पाणी बॉटलचे मोफत वितरण होणार

कार्तिकी यात्रा कालावधीत एकाही वारकऱ्याची गैरसोय होणार नाही याची दक्षता घ्यावी : उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

पंढरपूर/प्रतिनिधी : कार्तिकी वारीच्या अनुषंगाने जिल्हा प्रशासनाने वारकऱ्यांसाठी सर्व आवश्यक सुविधा उपलब्ध केलेल्या आहेत. सर्वसामान्य वारकरी भाविक हा आपला खरा व्हीआयपी आहे. त्यामुळे त्याचे समाधान झाले पाहिजे. सर्व सुविधांसह दर्शन वेळेत झाले पाहिजे. त्यामुळे प्रशासनाने यात्रा कालावधीत एकाही वारकऱ्याची कोणत्याही प्रकारची गैरसोय होणार नाही याची दक्षता घ्यावी व आवश्यक त्या सर्व सुविधा मोठ्या प्रमाणावर उपलब्ध कराव्यात. त्यासाठी आवश्यक असलेला निधी नगर विकास विभागाच्या माध्यमातून तात्काळ उपलब्ध करण्यात येईल, असे प्रतिपादन उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले.

■ पंढरपूर नगरपरिषदेला वारकऱ्यांना सोयी सुविधा देण्यासाठी नगर विकास विभागाकडून पाच कोटीचा निधी वितरित करण्यात आला आहे
■ भक्ती सागरसह इतर सर्व ठिकाणी वारकऱ्यांसाठी सुविधा निर्माण करण्यासाठी नगर विकास विभागाकडून निधी उपलब्ध करणार

पंढरपूर शासकीय विश्रामगृहाच्या सभागृहात आयोजित कार्तिकी वारी २०२६ च्या अनुषंगाने आढावा बैठकीत ते मार्गदर्शन करत होते. यावेळी जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन, आमदार राजू खरे, आमदार अभिजीत पाटील, उत्तम जानकर, पोलिस अधीक्षक अतुल कुलकर्णी, मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन, राष्ट्रीय महामार्गाचे प्रकल्प संचालक अभिजीत आवटी, नगराध्यक्ष प्रणिती भालके, मुख्याधिकारी महेश रोकडे, उपविभागीय अधिकारी सचिन इथापे, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. वर्षा डोईफोडे, जिल्हा आरोग्य अधिकारी संतोष कोपुरवाड, महावितरण चे अधीक्षक अभियंता सुनील माने, प्रादेशिक परिवहन अधिकारी गजानन, जिल्हा पुरवठा अधिकारी ओंकार पडोळे, मंदीर समितीचे कार्यकारी अधिकारी श्रीकांत यादव यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी व पदाधिकारी उपस्थित होते.



उपमुख्यमंत्री शिंदे पुढे म्हणाले की, येथे येणाऱ्या वारकरी, भाविकांना समाधान मिळाले पाहिजे. ही वारी निर्मल व स्वच्छ असली पाहिजे. वारकरी हाच व्हीआयपी असल्याने आपण व्हीआयपी दर्शन बंद केलेले आहे. यात्रा कालावधीत वारकऱ्यांना कोणत्याही प्रकारचे त्रास झाला नाही पाहिजे. पोलीस विभागानेही अत्यंत चोखपणे बंदोबस्त ठेवावा. वीज वितरण कंपनीने संपूर्ण यात्रा कालावधीत वीज पुरवठा सुरळीत राहील याची दक्षता घ्यावी, त्यासाठी आवश्यक असलेले मनुष्यबळ उपलब्ध ठेवावे, असे त्यांनी सूचित केले.

राष्ट्रीय महामार्गाचे अधिकाऱ्यांनी शहरातून जाणारा महामार्गाच्या रस्त्यावर धूळ राहणार नाही यासाठी तात्पुरते डांबरीकरण करून घ्यावे. महामार्गाचे काम अत्यंत संथ गतीने सुरू आहे, कामाची गती वाढवून रस्त्याचे काम त्वरित पूर्ण करण्याबाबत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी निर्देश दिले. येथे येणाऱ्यांना भाविकांना स्वच्छतेबरोबरच शुद्ध पिण्याचे पाणी उपलब्ध झाले पाहिजे त्या दृष्टीने काळजी घ्यावी तसेच दहा लाख पाणी बॉटल उपलब्ध झालेल्या आहेत, त्याचे मोफत वितरण सुरू झालेले आहे. आवश्यकता पडल्यास अधिक पाणी बॉटल उपलब्ध करून घ्याव्यात, असेही त्यांनी सूचित केले.

पंढरपूर शहरात वारकऱ्यांसाठी सुविधा निर्माण करण्यासाठी पुढील विविध प्रकल्पासाठी नगर विकास विभागाकडून पाहिजे तेवढा निधी उपलब्ध करून देण्यात येणार आहे. त्या पद्धतीने प्रशासनाने कामे करून घ्यावी. ६५ एकरचे प्लॉटचे कॉंक्रिटी करून करून घ्यावे त्या ठिकाणी वृक्ष लागवड ही करावी असे त्यांनी सांगितले. तसेच संपूर्ण यात्रा कालावधीत सर्व शासकीय यंत्रणा अशाच पद्धतीने कार्यान्वित राहील व वारकऱ्यांना सेवा देईल याची दक्षता घ्यावी असेही श्री. शिंदे यांनी सुचित केले. पंढरपूर नगरपरिषदेसाठी स्वीपर मशीन तसेच जेटिंग मशीन उपलब्ध करून देण्यात आलेले आहे असे त्यांनी सांगितले.

प्रारंभी जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन यांनी जिल्हा प्रशासनाच्या वतीने पंढरपूर शहरात येणाऱ्या वारकरी भाविकांसाठी उपलब्ध करून देण्यात आलेल्या सोयी सुविधांची माहिती दिली. स्वच्छतेसाठी पंढरपूर नगरपालिकेचे १२०० कर्मचारी कार्यरत असून १५०० शौचालयाची सुविधा उपलब्ध केलेली आहे. नगरपालिकेने अतिक्रमण काढण्याची मोहीम हाती घेतलेले आहे. जिल्हा परिषदेच्या वतीने ५० लाखाचे औषधे खरेदी करण्यात आलेली आहे. आरोग्य विभागाच्या वतीने आरोग्य शिबिर घेण्यात येणार आहे. वारकऱ्यांच्या सेवेसाठी प्रशासन सज्ज असल्याचे त्यांनी सांगितले. तर पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांनी पोलीस विभाग वारकऱ्यांच्या सुरक्षेसाठी सदैव कार्यरत असल्याचे सांगितले. गर्दीवर नियंत्रणासाठी वाहतुकीचे सुयोग्य नियोजन केल्याचे माहिती त्यांनी दिली तसेच संपूर्ण यात्रा कालावधीत पोलीस विभागाचा चोख बंदोबस्त ठेवण्यात आल्याचे त्यांनी सांगितले.


संपादकीय....

पंतप्रधानांचा सवाल

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी फेडरेशन ऑफ इंडियन चेंबर्स ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीच्या शताब्दी महोत्सवात पंतप्रधान मोदी यांनी उद्योग क्षेत्रातील प्रतिनिधींशी नुकताच संवाद साधला. यावेळी केंद्र सरकारनं विविध करांमध्ये केलेल्या कपातीचा लाभ कर्मचाऱ्यांपर्यंत पोहोचवला गेला पाहिजे, असं मोदींनी म्हटलं. कॉर्पोरेट क्षेत्राला दिलेल्या आयकरातील सवलतीचा उल्लेख करत मोदींनी उद्योजकांनी कर्मचाऱ्यांचा पगार वाढवला का? नव्या लोकांना नोकरी दिली का? असा सवाल मोदींनी केला. २०१४ मध्ये कॉर्पोरेट टॅक्सचा बेसिक रेट ३० टक्के होता, आम्ही तो कमी करुन २२ टक्क्यांवर आणला. आज भारतात १२ लाख रुपयांच्या उत्पन्नावर इनकम टॅक्स आकारला जात नाही. यानंतर मोदींनी उद्योग विश्वातील लोकांना प्रश्न विचारला की मी १२ लाख रुपयांपर्यंतच्या उत्पन्नावरील आयकर माफ माफ केला आहे. मात्र, तुम्ही कर्मचाऱ्यांचा पगार वाढवला? कामगारांची संख्या वाढवली का? मोदीजी तुम्ही करा आम्ही पाहू, या प्रकारे काम चालेल का?. उद्योग क्षेत्रातील लोक निर्णयामुळं कदाचित समाधानी नसतील हे माहिती असून देखील सरकारनं आयकरात दिलासा देण्याचा निर्णय घेतला. आयकरात कपात केल्यानं लोकांची खरेदी करण्याच्या क्षमतेत मोठी वाढ झाली आणि उद्योजकांना सराकरच्या या प्रयत्नांना स्वीकारण्यास सांगितलं. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटलं की मित्रांनो आम्ही आयकरात इतका मोठा दिलासा देण्याचं धाडस दाखवलं. यातून आपल्या लोकांची खरेदी करण्याची क्षमता मोठ्या प्रमाणात वाढली. यानंतर त्यांनी आयटीआर फाइल करण्याच्या आणि रिफंडच्या प्रक्रियेतील बदलांचा उल्लेख केला. केंद्र सरकारनं सिस्टीम सोपी बनवली आहे, कारण कर देणाऱ्या लोकांचा पैसा विनाकारण अडकू नये, असं मोदी म्हणाले. मोदी म्हणाले की तुम्हाला माहिती असेल एक पत्र यायला अगोदर ८ महिने लागायचे, आता एका आढवड्यात रिटर्न प्रोसेस होतात की नाही?

आंबेडकरवादी कवितेचा सामाजिक, सांस्कृतिक व भाषिक अभ्यास....!

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क





मराठी साहित्याच्या इतिहासात आंबेडकरवादी कवितेला स्वतंत्र, महत्त्वपूर्ण आणि परिवर्तनवादी स्थान प्राप्त झाले आहे. ही कविता केवळ भावभावनांची अभिव्यक्ती नसून शतकानुशतके सामाजिक विषमता, जातीय भेदभाव, अस्पृश्यता, शोषण आणि अन्याय सहन करणाऱ्या समाजाच्या वेदना, संघर्ष, अस्मिता आणि स्वाभिमानाचा सशक्त आविष्कार आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारधारेने प्रेरित झालेल्या या कवितेने मराठी साहित्याला नवी वैचारिक दिशा, नवी भाषिक जाणीव आणि सामाजिक परिवर्तनाची नवी दृष्टी दिली.

आंबेडकरवादी कविता ही प्रस्थापित सामाजिक व्यवस्थेला प्रश्न विचारणारी, विषमतेविरुद्ध आवाज उठवणारी आणि समताधिष्ठित समाजव्यवस्थेचे स्वप्न पाहणारी कविता आहे. स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि न्याय या संविधानिक मूल्यांचा पुरस्कार करताना या कवितेने माणसाला केंद्रस्थानी ठेवले. त्यामुळे तिचे स्वरूप केवळ साहित्यिक न राहता सामाजिक, सांस्कृतिक आणि वैचारिक चळवळीचे प्रभावी माध्यम बनले.

१. आंबेडकरवादी कवितेचा सामाजिक अभ्यास :

आंबेडकरवादी कवितेचा सर्वांत महत्त्वाचा पैलू म्हणजे तिचे सामाजिक भान. भारतीय समाजव्यवस्थेत जातिव्यवस्थेने निर्माण केलेली उच्च-नीचतेची भावना, अस्पृश्यता, सामाजिक बहिष्कार, धार्मिक रूढी आणि आर्थिक शोषण यांचे वास्तव या कवितेतून प्रकर्षाने व्यक्त झाले आहे. पूर्वीच्या साहित्यप्रवाहांमध्ये उपेक्षित समाजाचे जीवन अनेकदा बाहेरच्या दृष्टिकोनातून चित्रित केले जात होते. मात्र आंबेडकरवादी कवितेने उपेक्षित माणसाला स्वतःच्या जीवनाचा भाष्यकार बनवले. त्याच्या वेदना, अपमान, संघर्ष आणि अस्तित्वाचे प्रश्न त्याने स्वतःच्या शब्दांत मांडले. त्यामुळे या कवितेला अनुभवाधिष्ठित वास्तववादाचे महत्त्व प्राप्त झाले.

नामदेव ढसाळ, दया पवार, वामन निंबाळकर, यशवंत मनोहर, ज. वी. पवार, अरुण कांबळे आणि इतर कवींच्या कवितांमधून सामाजिक विषमतेचे विविध स्तर उलगडताना दिसतात. आंबेडकरवादी कविता जातिव्यवस्थेचा केवळ निषेध करत नाही, तर तिच्या निर्मितीमागील सामाजिक आणि वैचारिक व्यवस्थेचेही परीक्षण करते. ती माणसाच्या प्रतिष्ठेचा, शिक्षणाच्या अधिकाराचा, स्त्री-पुरुष समानतेचा आणि सामाजिक न्यायाचा आग्रह धरते. या कवितेतील विद्रोह हा केवळ नकारात्मक स्वरूपाचा नाही. तो अन्यायकारक व्यवस्थेच्या परिवर्तनासाठी उभा राहिलेला विधायक विद्रोह आहे. म्हणूनच आंबेडकरवादी कविता सामाजिक जागृती, आत्मभान आणि संघटनात्मक चेतना निर्माण करणारे प्रभावी माध्यम ठरते.

२. आंबेडकरवादी कवितेचा सांस्कृतिक अभ्यास :

आंबेडकरवादी कवितेचा दुसरा महत्त्वाचा पैलू म्हणजे सांस्कृतिक परिवर्तन. संस्कृती ही केवळ परंपरा, रूढी, सण-उत्सव आणि धार्मिक आचार-विचार यांपुरती मर्यादित नसते. ती समाजाच्या जीवनपद्धतीशी, मूल्यव्यवस्थेशी, अस्मितेशी आणि सामूहिक जाणिवांशी संबंधित असते. भारतीय समाजातील जातिव्यवस्थेने सांस्कृतिक क्षेत्रातही भेदभाव निर्माण केला होता. विशिष्ट समाजघटकांना सांस्कृतिक प्रतिष्ठेपासून वंचित ठेवण्यात आले. आंबेडकरवादी कवितेने या सांस्कृतिक वर्चस्वाला आव्हान दिले आणि वंचित समाजाच्या सांस्कृतिक अस्तित्वाला अभिव्यक्ती दिली.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा प्रभाव या कवितेच्या सांस्कृतिक जाणिवांवर स्पष्टपणे दिसतो. बौद्ध धम्मातील प्रज्ञा, करुणा आणि समता ही मूल्ये या कवितेच्या वैचारिक पायाभूत घटकांपैकी आहेत. बुद्ध, फुले, शाहू आणि आंबेडकर यांची विचारपरंपरा या कवितेला परिवर्तनवादी अधिष्ठान प्रदान करते. आंबेडकरवादी कविता पारंपरिक सांस्कृतिक प्रतीकांचे पुनर्मूल्यांकन करते. ती अंधश्रद्धा, कर्मकांड, धार्मिक रूढी आणि सांस्कृतिक गुलामगिरीला विरोध करते. त्याचबरोबर बौद्ध संस्कृती, मानवी प्रतिष्ठा, स्वाभिमान, विवेकनिष्ठा आणि वैज्ञानिक दृष्टिकोन यांचा पुरस्कार करते. या कवितेतून दलित अस्मितेची जाणीव अधिक प्रखर होते. स्वतःच्या इतिहासाचा शोध, सांस्कृतिक वारशाचे पुनर्वाचन आणि नव्या समाजनिर्मितीची आकांक्षा यांमुळे आंबेडकरवादी कविता सांस्कृतिक पुनर्जागरणाचे महत्त्वपूर्ण साधन ठरते.

३. आंबेडकरवादी कवितेचा भाषिक अभ्यास :

बेडकरवादी कवितेचे भाषिक वैशिष्ट्य तिच्या आशयाइतकेच महत्त्वाचे आहे. या कवितेने मराठी भाषेच्या अभिव्यक्तीविश्वात मूलभूत परिवर्तन घडवून आणले. पारंपरिक काव्यभाषेतील अलंकारिकता, अभिजनवादी शब्दरचना आणि कल्पनारम्यतेच्या पलीकडे जाऊन आंबेडकरवादी कवींनी सामान्य माणसाच्या जगण्यातील भाषा कवितेत आणली. या कवितेची भाषा अनुभवातून निर्माण झालेली आहे. झोपडपट्टी, वस्ती, श्रमजीवन, उपासमार, जातीय अपमान, सामाजिक संघर्ष आणि अन्याय यांचे चित्रण करताना कवींनी बोलीभाषा, लोकभाषा आणि दैनंदिन व्यवहारातील शब्दांचा प्रभावी वापर केला आहे. त्यामुळे या कवितेची भाषा कृत्रिम न राहता जिवंत, वास्तववादी आणि प्रभावी बनली आहे.

नामदेव ढसाळ यांच्या कवितेत आक्रमक, धारदार आणि विद्रोही भाषेचा आविष्कार दिसतो. त्यांच्या भाषेतून महानगरीय जीवनातील विदारक वास्तव, सामाजिक विषमता आणि मानवी अस्तित्वाची घुसमट व्यक्त होते. दया पवार यांच्या कवितेत वेदना, अनुभव आणि सामाजिक वास्तवाचे संयत भाषिक चित्रण आढळते. यशवंत मनोहर यांच्या कवितेत वैचारिकता, तत्त्वचिंतन आणि परिवर्तनवादी जाणिवांचे प्रभावी दर्शन घडते. आंबेडकरवादी कवितेत प्रतीक, प्रतिमा, रूपक, उपरोध, व्यंग आणि प्रश्नात्मक शैली यांचा प्रभावी वापर झालेला दिसतो. बुद्ध, धम्म, संविधान, समता, क्रांती, विद्रोह आणि स्वाभिमान ही प्रतीके केवळ शब्दरूपात येत नाहीत, तर ती विशिष्ट वैचारिक भूमिका आणि सामाजिक परिवर्तनाची दिशा व्यक्त करतात. या कवितेतील भाषिक विद्रोह हा प्रस्थापित भाषिक अभिरुचीला दिलेले आव्हान आहे. ज्या भाषेला अभिजनवादी साहित्यिक संस्कृतीत स्थान नव्हते, त्या भाषेला आंबेडकरवादी कवींनी प्रतिष्ठा मिळवून दिली. अशा प्रकारे आंबेडकरवादी कवितेने मराठी भाषेचे लोकशाहीकरण केले आणि भाषेला सामाजिक परिवर्तनाचे प्रभावी साधन बनवले.

४. आंबेडकरवादी कवितेतील विद्रोह आणि अस्मितेची जाणीव :

आंबेडकरवादी कवितेचा विद्रोह हा तिच्या मूलभूत प्रेरणांपैकी एक आहे. हा विद्रोह कोणत्याही व्यक्तीविरोधात नसून अन्यायकारक सामाजिक व्यवस्था, जातीय वर्चस्व, शोषण आणि मानवी प्रतिष्ठेला नाकारणाऱ्या विचारप्रणाली विरोधात आहे. या कवितेने उपेक्षित समाजाला स्वतःच्या अस्तित्वाची जाणीव करून दिली. आत्मदया आणि न्यूनगंडाच्या मानसिकतेतून बाहेर पडून स्वाभिमानाने जगण्याची प्रेरणा दिली. त्यामुळे आंबेडकरवादी कविता ही केवळ वेदनेची कविता न राहता आत्मभान, आत्मसन्मान आणि आत्मशक्तीची कविता बनली.

वशेषतः आंबेडकरवादी कवयित्रींच्या लेखनात जात आणि लिंग या दोन्ही पातळ्यांवरील शोषणाचे वास्तव प्रकर्षाने व्यक्त होते. हिरा बनसोडे, ज्योती लांजेवार, प्रज्ञा लोखंडे आणि इतर कवयित्रींनी स्त्रीच्या सामाजिक अस्तित्वाचे, स्वातंत्र्याचे आणि आत्मसन्मानाचे प्रश्न मांडले आहेत. त्यामुळे आंबेडकरवादी कवितेच्या अभ्यासात स्त्रीवादी दृष्टिकोनालाही महत्त्वाचे स्थान प्राप्त होते.

५. आंबेडकरवादी कवितेचे योगदान :

आंबेडकरवादी कवितेने मराठी साहित्याला आशय, अभिव्यक्ती आणि सौंदर्यदृष्टी या तिन्ही स्तरांवर नवे परिमाण दिले. साहित्य हे केवळ मनोरंजन किंवा भावनाविलासाचे साधन नसून सामाजिक परिवर्तनाचे माध्यम असू शकते, ही जाणीव या कवितेने अधिक दृढ केली. या कवितेने साहित्याच्या केंद्रस्थानी वंचित, शोषित, कष्टकरी, स्त्रिया आणि उपेक्षित समूहांना आणले. त्यांच्या जीवनानुभवांना साहित्यिक प्रतिष्ठा प्राप्त करून दिली. पारंपरिक साहित्यिक सौंदर्याच्या संकल्पनांचे पुनर्मूल्यांकन करून अनुभव, वास्तव, विद्रोह आणि सामाजिक बांधिलकी यांना साहित्यिक मूल्य म्हणून मान्यता मिळवून दिली.

आंबेडकरवादी कविता आजही सामाजिक न्याय, मानवी हक्क, स्त्रीस्वातंत्र्य, धर्मनिरपेक्षता, संविधानिक मूल्ये आणि लोकशाहीच्या रक्षणासाठी महत्त्वाची ठरते. बदलत्या सामाजिक, राजकीय आणि सांस्कृतिक परिस्थितीत या कवितेची प्रासंगिकता अधिक व्यापक होत आहे. मराठी दलित कवितेतील संविधानिक मूल्यांवरील अलीकडील संशोधनही या परिवर्तनवादी भूमिकेचे महत्त्व अधोरेखित करते.

बेडकरवादी कविता ही मराठी साहित्यविश्वातील केवळ एक साहित्यिक शाखा नसून सामाजिक परिवर्तनाची वैचारिक चळवळ आहे. या कवितेने शोषित आणि वंचित समाजाच्या वेदनांना शब्द दिले, अन्यायाविरुद्ध विद्रोहाची चेतना निर्माण केली आणि स्वाभिमानाने जगण्याची प्रेरणा दिली. सामाजिक स्तरावर तिने जातीय विषमता, अस्पृश्यता आणि शोषणाला आव्हान दिले. सांस्कृतिक स्तरावर तिने बौद्ध धम्म, विवेकनिष्ठा, अस्मिता आणि सांस्कृतिक स्वाभिमान यांचा पुरस्कार केला. भाषिक स्तरावर तिने बोलीभाषा, लोकभाषा, अनुभवाधिष्ठित शब्दरचना आणि विद्रोही अभिव्यक्ती यांना प्रतिष्ठा मिळवून दिली.

या तिन्ही अंगांचा एकत्रित विचार केला असता असे लक्षात येते की, आंबेडकरवादी कविता ही सामाजिक वास्तवाचे प्रतिबिंब दाखवणारी, सांस्कृतिक परिवर्तनाची दिशा देणारी आणि भाषिक लोकशाहीचा पुरस्कार करणारी सशक्त साहित्यिक अभिव्यक्ती आहे. तिचे अंतिम उद्दिष्ट केवळ अन्यायाचा निषेध करणे नसून न्याय, समता, स्वातंत्र्य आणि बंधुता यांवर आधारित मानवी समाजाची निर्मिती करणे हे आहे. म्हणूनच आंबेडकरवादी कवितेचा सामाजिक, सांस्कृतिक आणि भाषिक अभ्यास हा मराठी साहित्याच्या विकासाचा अभ्यास करण्याबरोबरच भारतीय समाजाच्या परिवर्तनशील जाणिवांचा शोध घेण्याचा महत्त्वपूर्ण मार्ग ठरतो.



– (आंबेडकरवादी साहित्याचे अभ्यासक)
संवाद : ९७६४६७६४९९
– मुन्नाभाई नंदागवळी

दुष्काळी तालुक्यांत अनावश्यक बांधकामांना स्थगिती

(पान १ वरून..) अंतर्गत सिमेंट रस्ते, नवीन नाले आणि गटारांची कामे यांचा त्यात समावेश असू शकतो. किरकोळ दुरुस्तीच्या नावाखाली नवीन बांधकामे करता येणार नाहीत. मात्र, यापूर्वी सुरू झालेल्या सर्व कामांना सरसकट स्थगिती देण्यात आलेली नाही. कराराच्या अटी, सार्वजनिक सुरक्षितता, झालेला खर्च, काम थांबविल्यास होणारे नुकसान आणि संभाव्य आर्थिक दायित्व यांचा विचार करून प्रत्येक प्रकरणाचा स्वतंत्र निर्णय घ्यावा लागणार आहे. प्रशासकीय मान्यता मिळाली असली, तरी प्रत्यक्ष सुरू न झालेली कामे पुढे ढकलण्याबाबत कारणांसह निर्णय घ्यावा लागेल. टंचाई निवारणासाठी अत्यावश्यक असलेल्या पिण्याच्या पाण्याच्या योजना, जलस्रोत बळकटीकरण, नवीन जलस्रोत निर्मिती, पशुधनासाठी पाणी व चारा, जलसंधारण, लघुसिंचन आणि सार्वजनिक आरोग्य व सुरक्षिततेच्या कामांना या स्थगितीतून वगळण्यात आले आहे. मात्र, अशा कामांना संबंधित योजनांच्या निकषांनुसार मंजुरी असणे आवश्यक आहे. पिण्याच्या पाण्यासाठी राखीव असलेल्या पाण्याचा बांधकामासाठी वापर करता येणार नाही, असेही स्पष्ट करण्यात आले आहे.

निफाड तालुक्यातील जलाशयांतील अनधिकृत पाणी उपशावर प्रशासनाचा वॉच!

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

निफाड/प्रतिनिधी : निफाड तालुक्यातील जलाशय, नदी, नाले, तलाव, कोल्हापूर पद्धतीचे बंधारे तसेच कालव्यांमधून होणारा अनधिकृत पाणी उपसा रोखण्यासाठी प्रशासनाने कठोर पावले उचलली आहेत. पिण्याच्या पाण्याला प्राधान्य देत जलसाठ्यांचे संरक्षण आणि पाण्याच्या अनधिकृत वापरावर नियंत्रण ठेवण्यासाठी तालुक्यातील ११ महसूल मंडळांमध्ये स्वतंत्र भरारी पथकांची नियुक्ती करण्यात आली आहे. सायफन पद्धतीने होणारा पाणी उपसा, अनधिकृत मोटारी, अनधिकृत वीज जोडण्या आणि अन्य गैरप्रकारांवर ही पथके नियमित पाहणी करून कारवाई करणार आहेत.

निफाडचे उपविभागीय अधिकारी डॉ. शशिकांत मंगरुळे यांनी दिनांक १७ नोव्हेंबर २०२६ रोजी यासंदर्भात आदेश जारी केला आहे. त्यानुसार निफाड, रानवड, पिंपळगाव (ब.), पालखेड, सायखेडा, ओझर, चांदोरी, देवगाव, लासलगाव, नांदूरमध्यमेश्वर आणि विंचूर या ११ मंडळांसाठी भरारी पथके गठित करण्यात आली आहेत. महाराष्ट्र राज्य जलनीतीनुसार पिण्याचे पाणी, शेती आणि औद्योगिक वापरासाठी पाण्याचा प्राधान्यक्रम निश्चित करण्यात आला आहे. मात्र, जलाशय, नद्या, तलाव, कोल्हापूर पद्धतीचे बंधारे आणि कालव्यांमधून होणाऱ्या अनधिकृत पाणी उपशामुळे पाणीसाठ्याच्या नियोजनावर परिणाम होत आहे. या पार्श्वभूमीवर शासन निर्णय आणि वरिष्ठ कार्यालयांच्या निर्देशानुसार तालुकास्तरावर ही विशेष यंत्रणा कार्यान्वित करण्यात आली आहे. प्रत्येक मंडळातील भरारी पथकात जिल्हा परिषद, महावितरण, महसूल आणि पोलीस विभागातील अधिकाऱ्यांचा समावेश आहे. जिल्हा परिषद शाखा अभियंता प्रशांत किशोर आराक यांच्याकडे सर्व मंडळांतील पथकांच्या समन्वयाची जबाबदारी देण्यात आली आहे. महावितरणचे अधिकारी निफाड हे संनियंत्रण ठेवणार असून, पथकांनी केलेल्या पाहणीचा आणि कारवाईचा अहवाल नियमितपणे सादर करण्याचे आदेशात नमूद आहे. पिण्याच्या पाण्याच्या उपलब्धतेशी संबंधित ही बाब अत्यंत महत्त्वाची असल्याने सर्व संबंधित अधिकाऱ्यांनी वैयक्तिक लक्ष घालून जबाबदारीने काम करावे, असेही स्पष्ट करण्यात आले आहे. नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांविरोधात नियमानुसार वैधानिक कारवाईचा प्रस्ताव सादर करण्यात येणार आहे.

डोंगळे, अनधिकृत मोटारी व अनधिकृत वीज जोडण्यांवर होणार कारवाई; निफाड तालुक्यात ११ मंडळांत भरारी पथके नियुक्त

अनधिकृत वीजजोडण्या आणि विद्युत उपकरणांची तपासणी करणार आहेत. महसूल विभागाचे मंडळ अधिकारी प्रत्यक्ष पाहणी व कारवाईच्या प्रक्रियेत सहभागी होतील, तर पोलीस विभाग आवश्यक सहकार्य करणार आहे. भरारी पथकांना त्यांच्या कार्यक्षेत्रातील जलाशय, नदी, नाले, तलाव, कोल्हापूर पद्धतीचे बंधारे आणि कालव्यांची नियमित पाहणी करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. पाहणी दरम्यान अनधिकृत पाणी उपसा, सायफन पद्धतीने पाणी वळविणे, विनापरवानगी मोटारी बसविणे, अनधिकृत वीजजोडण्या किंवा अन्य गैरप्रकार आढळल्यास संबंधित विभागाच्या समन्वयाने तातडीने नियमानुसार कारवाई केली जाणार आहे.

विशेष म्हणजे, पिण्याच्या पाण्यासाठी राखीव असलेल्या जलसाठ्यांचा अन्य कारणांसाठी अनधिकृत वापर होणार नाही, याची दक्षता घेण्याची जबाबदारीही पथकांवर सोपविण्यात आली आहे. कारवाईदरम्यान आढळलेल्या प्रकरणांची नोंद ठेवून केलेल्या कारवाईचा नियमित अहवाल सादर करणे बंधनकारक करण्यात आले आहे. सर्व भरारी पथकांच्या कामकाजावर तहसीलदार, निफाड हे संनियंत्रण ठेवणार असून, पथकांनी केलेल्या पाहणीचा आणि कारवाईचा अहवाल नियमितपणे सादर करण्याचे आदेशात नमूद आहे. पिण्याच्या पाण्याच्या उपलब्धतेशी संबंधित ही बाब अत्यंत महत्त्वाची असल्याने सर्व संबंधित अधिकाऱ्यांनी वैयक्तिक लक्ष घालून जबाबदारीने काम करावे, असेही स्पष्ट करण्यात आले आहे. नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांविरोधात नियमानुसार वैधानिक कारवाईचा प्रस्ताव सादर करण्यात येणार आहे.

■ जलसाठ्यांमधील उपलब्ध पाणी जपणे, पिण्याच्या पाण्याची गरज प्राधान्याने भागविणे आणि अनधिकृत पाणी उपशाला आळा घालणे या उद्देशाने प्रशासनाने ही मोहीम हाती घेतली आहे. त्यामुळे आता तालुक्यातील जलाशय, नद्या आणि कालव्यांमधील पाणी उपशावर भरारी पथकांची करडी नजर राहणार आहे.

– विशाल नाईकवाडे
तहसिलदार, निफाड

■ मंडळनिहाय भरारी पथकातील अधिकारी व संपर्क क्रमांक

१) निफाड मंडळ

समन्वयक – प्रशांत किशोर आराक, शाखा अभियंता, जिल्हा परिषद मो. ९५९५४३६९६८

सदस्य – हेमंत शिनकर, शाखा अभियंता, महावितरण मो. ७८७५६९१७०८

सदस्य – अश्विनी भोसले, मंडळ अधिकारी, महसूल विभाग मो. ९७३०७०१७९२

सदस्य – विजय गायकवाड, पोलीस उपनिरीक्षक मो. ८२०८३७०४०९

२) रानवड मंडळ

समन्वयक – प्रशांत किशोर आराक, शाखा अभियंता, जिल्हा परिषद मो. ९५९५४३६९६८

सदस्य – महादेव मुंडे, शाखा अभियंता, महावितरण मो. ७८७५७६६५०२

सदस्य – गोविंद काळे, मंडळ अधिकारी, महसूल विभाग मो. ८३०८८८४२३३

सदस्य – सूर्यकांत कडलग, पोलीस उपनिरीक्षक मो. ९६२३२८३५७२

३) पिंपळगाव (ब.) मंडळ

समन्वयक – प्रशांत किशोर आराक, शाखा अभियंता, जिल्हा परिषद मो.९५९५४३६९६८

सदस्य – महादेव मुंडे, शाखा अभियंता, महावितरण मो.७८७५७६६५०२

सदस्य – जयंत लिल्के, मंडळ अधिकारी, महसूल विभाग मो. ९८९००८२५९०

सदस्य – सूर्यकांत कडलग, पोलीस उपनिरीक्षक मो.९६२३२८३५७२

४) पालखेड मंडळ

समन्वयक – प्रशांत किशोर आराक, शाखा अभियंता, जिल्हा परिषद मो.९५९५४३६९६८

सदस्य – महादेव मुंडे, शाखा अभियंता, महावितरण मो.७८७५७६६५०२

सदस्य – यादव बच्छाव, मंडळ अधिकारी, महसूल विभाग मो.७७४१०७७५३३

सदस्य – सूर्यकांत कडलग, पोलीस उपनिरीक्षक मो.९६२३२८३५७२

५) सायखेडा मंडळ

समन्वयक – प्रशांत किशोर आराक, शाखा अभियंता, जिल्हा परिषद मो. ९५९५४३६९६८

सदस्य – संदीप गडाख, शाखा अभियंता, महावितरण मो.७८७५६६९०९४

सदस्य – प्रमोद रणदिवे, मंडळ अधिकारी, महसूल विभाग मो.९८९०२६१७१९

सदस्य : संबंधित पोलीस उपनिरीक्षक (आदेशात नाव व मोबाईल क्रमांक नमूद नाही.)

६) ओझर मंडळ

समन्वयक – प्रशांत किशोर आराक, शाखा अभियंता, जिल्हा परिषद मो.९५९५४३६९६८

सदस्य – सुवर्णा मोरे, शाखा अभियंता, महावितरण मो.७८७५६६८८८५

सदस्य – शशिकांत विधाते, मंडळ अधिकारी, महसूल विभाग मो.८३२९९८९९७१

सदस्य – शशिकांत दाणे, पोलीस उपनिरीक्षक मो.९५९४९१४४७२

७) चांदोरी मंडळ

समन्वयक – प्रशांत किशोर आराक, शाखा अभियंता, जिल्हा परिषद मो. ९५९५४३६९६८

सदस्य – चंद्रशेखर निकम, शाखा अभियंता, महावितरण मो.७८७५६६८३३७

सदस्य – जयंत लिल्के, मंडळ अधिकारी, महसूल विभाग मो.९८९००८२५९०

सदस्य : संबंधित पोलीस उपनिरीक्षक (आदेशात नाव व मोबाईल क्रमांक नमूद नाही.)

८) देवगाव मंडळ

समन्वयक – प्रशांत किशोर आराक, शाखा अभियंता, जिल्हा परिषद मो.९५९५४३६९६८

सदस्य – किशोर पाटील, शाखा अभियंता, महावितरण मो.७८७५६९१७१६

सदस्य – उल्हास टर्ले, मंडळ अधिकारी, महसूल विभाग मो.८२७५५८३४३५

सदस्य – मोहन पाटील, पोलीस उपनिरीक्षक मो.७७७४८०७६०९

९) लासलगाव मंडळ

समन्वयक – प्रशांत किशोर आराक, शाखा अभियंता, जिल्हा परिषद मो.९५९५४३६९६८

सदस्य – राहुल पाटील, शाखा अभियंता, महावितरण मो.७८७५६९१२१९

सदस्य – रुपाली साळवे, मंडळ अधिकारी, महसूल विभाग मो.९४०४३२४३७४

सदस्य – मोहन पाटील, पोलीस उपनिरीक्षक मो.७७७४८०७६०९

१०) नांदूरमध्यमेश्वर मंडळ

समन्वयक – प्रशांत किशोर आराक, शाखा अभियंता, जिल्हा परिषद मो.९५९५४३६९६८

सदस्य – एस. एस. घोटेकर, शाखा अभियंता, महावितरण मो.७८७५६९०५५८

सदस्य – गोविंद काळे, मंडळ अधिकारी, महसूल विभाग मो.८३०८८८४२३३

सदस्य – विजय गायकवाड, पोलीस उपनिरीक्षक मो.८२०८३७०४०९

११) विंचूर मंडळ

समन्वयक – प्रशांत किशोर आराक, शाखा अभियंता, जिल्हा परिषद मो.९५९५४३६९६८

सदस्य – दीपक पाटील, शाखा अभियंता, महावितरण मो.७८७५६९१४०३

सदस्य – रुपाली साळवे, मंडळ अधिकारी, महसूल विभाग मो. ९४०४३२४३७४

सदस्य – मोहन पाटील, पोलीस उपनिरीक्षक मो.७७७४८०७६०९

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल – yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

कार्तिकी वारीच्या अनुषंगाने उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडून पंढरपूरातील सुविधांची पाहणी

भक्तीसागर, वाळवंट, व पत्राशेड परिसरातील स्वच्छता, आरोग्य सुविधा व वारकऱ्यांच्या सोयींचा घेतला आढावा; आवश्यक विकासकामे करण्याचे निर्देश

■ तनपुरे मठ येथे आंबे दुर्घटनेतील मृत कामगारांच्या नातेवाईकांची सांत्वनपर भेट–

■ वारकरी हाच व्हीआयपी असल्याने स्वतः उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मुखदर्शन घेतले



दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

पंढरपूर, (जिमाका) : कार्तिकी वारी २०२६ च्या अनुषंगाने प्रशासनाने वारकऱ्यांसाठी केलेल्या नियोजन व सुविधांची पाहणी करण्यासाठी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पंढरपूर येथील ६५ एकर (भक्ती सागर), वाळवंट, चंद्रभागा नदीपात्र परिसराला भेट दिली. यावेळी त्यांनी पंढरपूर नगरपरिषदेच्या आधुनिक स्वच्छता वाहनाचे उद्घाटन केले. त्यानंतर आरोग्य शिबिराला भेट देऊन रुग्णांशी संवाद साधला तसेच आपत्कालीन मदत केंद्रातील सुविधांची माहिती घेतली.

भक्ती सागर परिसरातील नदी घाटावर जाऊन त्यांनी घाटाच्या स्वच्छतेची पाहणी केली. यावेळी स्वतः पाण्याचा फवारा मारून स्वच्छता केली. वारकरी भाविकांशी संवाद साधत त्यांच्यासाठी उपलब्ध करून दिलेल्या सुविधांची माहिती घेतली. परिसरातील भजनी मंडळांच्या सहभागाने विठ्ठलनामाचा गजर सुरू असताना उपमुख्यमंत्री शिंदे यांनीही भक्तीमय वातावरणाचा अनुभव घेतला.

६५ एकर परिसरातील काही भागाचे काँक्रिटीकरण करण्याच्या सूचना त्यांनी प्रशासनाला दिल्या. तसेच परिसरात मोठ्या प्रमाणावर वृक्षलागवड करण्याचे निर्देश दिले. आवश्यक विकासकामांसाठी नगरविकास विभागाच्या माध्यमातून निधी उपलब्ध करून देण्यात आले. भाविकांसाठी उभारण्यात आलेल्या शौचालयांची स्वच्छता, पाणीपुरवठा व्यवस्था तसेच परिसरातील स्वच्छतेची पाहणी करून आवश्यक सूचना दिल्या. वाळवंटात आरोग्य विभागाच्या वतीने उभारण्यात आलेल्या रुग्णालयाची पाहणी केली तसेच शरीरची माहिती घेतलीन. यावेळी चक्कर येऊन पडलेल्या भाविकांना तात्काळ या रुग्णालयात उपचार देण्यात आले. नदीपात्रात उजनी धरणातून सोडण्यात आलेल्या पाण्याबाबतही त्यांनी माहिती घेतली. नदीपात्रात बोट व होडीतून प्रवास करणाऱ्या भाविकांच्या सुरक्षेसाठी लाईफ जॅकेट अनिवार्य करण्याबाबत संबंधित यंत्रणांनी दक्षता घ्यावी, असे निर्देश त्यांनी दिले. त्यांनी स्वतःही लाईफ जॅकेट घालून बोटीतून प्रवास केला.

पत्राशेड येथील दर्शन रांगेची पाहणी केली. तसेच या ठिकाणी प्रशासनाच्या वतीने उपलब्ध करण्यात आलेल्या सोयीसुविधांची ही पाहणी केली. या ठिकाणी भाविकांसाठी मोफत पाणी बॉटल वाटप च वितरणही उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी त्यांनी भाविकांशी संवाद साधला व प्रशासनाने उपलब्ध केलेल्या सुविधा विषयी त्यांचे मते जाणून घेतली.

उपमुख्यमंत्री यांच्याकडून श्री विठ्ठलाचे मुखदर्शन

सर्वसामान्य वारकरी भाविक हा पायी चालत श्री विठ्ठल रुक्मिणीच्या दर्शनासाठी पंढरपुरात येतो. येथे अनेक तास दर्शन रांगेत थांबतो. तो वारकरीच खरा व्हीआयपी आहे, त्यामुळे त्या वारकऱ्याला वेळेत व सुलभ दर्शन मिळणे आवश्यक आहे. त्यामुळे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी स्वतः श्री विठ्ठलाचे मुखदर्शन घेतले.

तनपुरे मठ येथे आंबे दुर्घटनेतील मृत कामगारांच्या नातेवाईकांची सांत्वनपर भेट–

आंबे येथील दुर्घटनेत मृत्यू झालेल्या कामगारांच्या कुटुंबीयांची उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी तनपुरे मठ येथे भेट घेऊन सांत्वन केले. यावेळी राज्य शासनाच्या वतीने प्रत्येक मृत कामगाराच्या कुटुंबाला पाच लाख रुपयांची आर्थिक मदत देण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले. ही मदत २१ नोव्हेंबर २०२६ रोजी कार्तिकी यात्रेच्या शासकीय महापूजेनंतर आयोजित कार्यक्रमात संबंधित कुटुंबांना धनादेशाद्वारे वितरित करण्याबाबत जिल्हा प्रशासनाला सूचना दिल्या.

तसेच, दुर्घटनेत मृत्यू झालेल्या प्रत्येक कामगाराच्या कुटुंबातील मुलाला नोकरी मिळवून देण्याची आणि मुलीच्या शिक्षणाची जबाबदारी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी स्वतः घेतली. या माध्यमातून दुर्घटनाग्रस्त कुटुंबांना आर्थिक आधार देण्यासोबतच त्यांच्या मुलांच्या भविष्याची काळजी घेण्याची ग्वाही त्यांनी दिली.

यावेळी जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन, आमदार राजू खरे, आमदार अभिजीत पाटील, पोलिस अधीक्षक अतुल कुलकर्णी, जिल्हा प्रशासन अधिकारी नगरपालिका आशिष लोकरे, नगराध्यक्ष प्रणिती भालके, मुख्याधिकारी महेश रोकडे, उपविभागीय अधिकारी सचिन इथापे, सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता अमित निमकर यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी व पदाधिकारी उपस्थित होते.

योगासन स्पर्धेत विश्वशांती गुरुकुलच्या विद्यार्थ्यांचे घवघवीत यश!

जिल्हास्तरीय स्पर्धेत प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकासह विभागीय स्तरावर निवड

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

पंढरपूर : चएएठी चखढ पुणे संचलित विश्वशांती गुरुकुल स्कूल, पंढरपूर येथील विद्यार्थ्यांनी जिल्हा क्रीडा अधिकारी (उ्हज) यांच्या वतीने आयोजित २०२६–२७ च्या जिल्हास्तरीय योगासन स्पर्धेत उल्लेखनीय यश संपादन केले आहे. सोलापूर येथील राजीव गांधी स्टेडियममध्ये ही स्पर्धा पार पडली.

या स्पर्धेत विद्यार्थ्यांनी विविध योगासन प्रकारांत प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक मिळवून शाळेच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला.

१९ वर्षांखालील मुली व मुलांच्या गटातील यश :

सिद्धी सावंत हिने १९ वर्षांखालील मुलींच्या आर्टिस्टिक योगासन पेअर प्रकारात प्रथम क्रमांक पटकावून पुणे येथे होणाऱ्या विभागीय स्पर्धेसाठी पात्रता मिळवली.

वाणीश्री घाडगे हिने आर्टिस्टिक योगासन पेअर तसेच आर्टिस्टिक सिंगल योगासन या दोन्ही प्रकारांत प्रथम क्रमांक मिळवून विभागीय स्तरावर धडक मारली.

मुस्तफा जमादार व शौर्य चौगुले यांनी १९ वर्षांखालील मुलांच्या आर्टिस्टिक योगासन पेअर प्रकारात प्रथम क्रमांक मिळवून विभागीय स्पर्धेसाठी पात्रता मिळवली.

१७ वर्षांखालील मुलांच्या गटातील यश :

सिद्धेश्वर यादव व आर्यन दोभाडा यांनी आर्टिस्टिक योगासन पेअर प्रकारात प्रथम क्रमांक मिळवला.

याच जोडीने रिदमिक पेअर योगासन प्रकारातही प्रथम क्रमांक पटकावत विभागीय स्पर्धेसाठी आपली निवड निश्चित केली.

१७ वर्षांखालील मुलींच्या गटातील यश :

स्वस्ती मालवडकर व ज्ञानेश्वरी वानवे यांनी आर्टिस्टिक योगासन पेअर प्रकारात द्वितीय क्रमांक मिळवला.

स्वरा चव्हाण व काव्यांजली इंगवले यांनी रिदमिक योगासन पेअर प्रकारात तृतीय क्रमांक पटकावला.

योगासन स्पर्धेसाठी आवश्यक एकाग्रता आणि शारीरिक समतोल याबाबत योग शिक्षिका पल्लवी पाटील,मनीष संपागे, ऋषिकेश गावडे व वैभव चौधरी यांनी सर्व विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. यावेळी शाळेचे मुख्याध्यापक शिवाजी गवळी यांनी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे कौतुक केले.

सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले व पुढील विभागीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

अधीक्षक अभियंता धनराज बिक्कड यांचा महासंघाकडून यथोचित सत्कार

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

धाराशिव /प्रतिनिधी : महावितरणच्या धाराशिव मंडळ येथे नव्याने रुजू झालेले अधीक्षक अभियंता श्री. धनराज बिक्कड यांचा महाराष्ट्र वीज कामगार महासंघाच्या वतीने अत्यंत आदरपूर्वक व यथोचित सत्कार करण्यात आला. या प्रसंगी महासंघाच्या वतीने अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या विविध प्रलंबित प्रश्नांबाबत त्यांच्याशी सविस्तर व सकारात्मक चर्चा करण्यात आली.

या सत्कार सोहळ्याप्रसंगी कामगारांच्या दैनंदिन कार्यपद्धतीतील अडचणी, विविध प्रलंबित मागण्या, तसेच कार्यक्षमता व सेवाभावाने काम करण्यासंदर्भातील मुद्द्यांवर सखोल विचारविनिमय झाला. अधीक्षक अभियंता बिक्कड यांनी महासंघाच्या पदाधिकाऱ्यांचे म्हणणे ऐकून घेत, आवश्यक त्या प्रश्नांवर योग्य कार्यवाही व सहकार्याची ग्वाही दिली.



या प्रसंगी महासंघाचे झोन अध्यक्ष नवनाथ बडे, झोन सचिव प्रवीण रत्नपारखी, मंडळ अध्यक्ष शाम आबाचणे, सहसचिव नवनाथ काकडे, धाराशिव विभाग सचिव उमाकांत जाधव, शिवाजी साळुंके, तुळजापूर विभाग सचिव मोहन गुरव, जालिंदर पांचाळ, तसेच महासंघाच्या महिला प्रतिनिधी सौ. संगीता वेदपाठक यांच्यासह महासंघाचे अनेक पदाधिकारी व सभासद उपस्थित होते.



शेतकऱ्यांनी जनावरांच्या चाऱ्या करिता वैरण विकास योजनेचा लाभ घ्या : डॉ. वाघमोडे

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

निफाड/प्रतिनिधी : यंदा दुष्काळामुळे ग्रामीण भागामध्ये जनावरांना हिरवा चाऱ्याचे प्रश्न गंभीर बनला असल्याने जनावरांना चारा टंचाई भासत असल्याने नाशिक जिल्हा पशुसंवर्धन व दुग्ध विकास विभागामार्फत शेतकऱ्यांना मोफत चारा बियाणे वाटप सुरू करण्यात आले असून या उपक्रमाचा शुभारंभ निफाड तालुक्यातील धारणगाव विर येथून करण्यात आला शेतकऱ्यांनी हिरव्या चाऱ्याकर्ता पाण्याच्या भागात वैरण विकास योजनेचा लाभ घ्यावा असे आव्हान याप्रसंगी पशुवैद्यकीय अधिकारी डॉक्टर वाघमोडे यांनी केले आहे.

वैरण विकास योजनेअंतर्गत जनावरांना हिरवा चारा उपलब्ध करणे कामी पशुसंवर्धन विभागामार्फत मका व ज्वारीचे बियाणे वाटप करण्यात आले आहे याप्रसंगी रुई विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थेचे अध्यक्ष श्री निवृत्ती चव्हाणके यांचे हस्ते बियाणे वाटप करण्यात आले. या योजनेचा लाभ घेण्यासाठी शेतकऱ्यांनी आधार कार्ड सातबारा उतारा आणि रेशन कार्ड घेऊन जवळच्या पशु वैद्यकीय अधिकारी यांच्याशी संपर्क साधावा व शेतकऱ्यांनी दुष्काळाशी सामना करिता जास्तीत जास्त हिरवा चारा उपलब्ध कसा होईल याचे नियोजन करावे त्याचप्रमाणे जनावरांकरिता शासकीय विमा योजना तसेच इतर लसी योजनांचा लाभ घ्यावा असे आव्हान पशुसंवर्धन विभागामार्फत पशुवैद्यकीय अधिकारी डॉक्टर वाघमोडे यांनी केले आहेत. याप्रसंगी रुई येथील दुग्ध व्यवसायिक श्री ज्ञानदेव गायकवाड बापूसाहेब तासकर धारणगाव वीर चे उपसरपंच सोमनाथ गंभीरे दिगंबर रोठे सुनील तासकर मच्छिंद्र तासकर भाऊसाहेब तासकर भीमा रोटे काशिनाथ होन राजेंद्र गायकवाड रावसाहेब तासकर वाल्मीक ठोंबरे संदीप निकम त्रंबक निकम यांच्यासह असंख्य पशु पालक शेतकरी या योजनेत सहभागी होण्यासाठी उपस्थित होते.

दुष्काळाच्या संकटात पशुधन वाचविण्यासाठी सुरू करण्यात आलेले या उपक्रमाचा निफाड तालुक्यातील प्रत्येक पशुवैद्यकीय दवाखान्यात जास्तीत जास्त लाभ शेतकऱ्यांनी घ्यावा असे आव्हान रुई येथील सामाजिक कार्यकर्ते श्री बापूसाहेब तासकर यांनी केले आहे

सत्यगाव येथे ग्रामीण कृषि कार्यानुभव उपक्रमास सुरुवात; कृषी विद्यार्थ्यांकडून शेतकऱ्यांना आधुनिक तंत्रज्ञानाचे मार्गदर्शन



दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

निफाड/प्रतिनिधी : येवला तालुक्यातील सत्यगाव येथे आधुनिक शेती आणि ग्रामीण विकासाला चालना देणाऱ्या ग्रामीण कृषी कार्यानुभव (रावे) उपक्रमास उत्साहात सुरुवात झाली आहे. कृषी विद्यार्थ्यांच्या आगमनाने गावात नवचैतन्य निर्माण झाले असून, आधुनिक कृषी तंत्रज्ञान शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न या उपक्रमातून केला जाणार आहे.

महात्मा फुले कृषी विद्यापीठाशी संलग्न व मराठा विद्या प्रसारक समाज संचालित कर्मयोगी दुलाजी सिताराम पाटील कृषी महाविद्यालयातील अंतिम वर्षाचे कृषी पदवीचे विद्यार्थी पुढील अडीच ते तीन महिने सत्यगाव येथे वास्तव्यास राहून शेतकऱ्यांशी प्रत्यक्ष संवाद साधणार आहेत. दिनांक १८ नोव्हेंबर रोजी विद्यार्थ्यांचे गावात आगमन होताच ग्रामस्थ व शेतकऱ्यांनी त्यांचे उत्साहात स्वागत केले. यानंतर विद्यार्थ्यांनी गावाचा दौरा करून भौगोलिक परिस्थिती, जलस्रोत, पीकपद्धती तसेच शेतीतील स्थानिक समस्यांचा प्राथमिक आढावा घेतला. यावेळी ज्येष्ठ शेतकरी आणि युवकांशी संवाद साधत बदलत्या हवामानामुळे शेतीसमोर निर्माण होणाऱ्या आव्हानांवर चर्चा करण्यात आली. या उपक्रमांतर्गत विद्यार्थी आधुनिक कृषी तंत्रज्ञान, सुधारित बियाणे, संतुलित खत व्यवस्थापन, कीड नियंत्रण, सेंद्रिय शेती आणि कृषी प्रक्रिया उद्योगांची माहिती प्रात्यक्षिकांसह शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविणार आहेत. कृष्णा शिंदे आणि प्रणव राजोळे या विद्यार्थ्यांचा या उपक्रमात सहभाग असून, गावातील शेती अधिक सक्षम व आधुनिक करण्यासाठी ते प्रयत्नशील राहणार आहेत. आगामी काळात माती परीक्षण, पीक संरक्षण, सेंद्रिय शेती आणि कृषी प्रक्रिया उद्योग या विषयांवर विशेष कार्यशाळांचे आयोजन करण्यात येणार आहे. या उपक्रमामुळे सत्यगावच्या शेती व्यवस्थेला आधुनिकतेची जोड मिळून ग्रामीण विकासाला नवी दिशा मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. संपूर्ण उपक्रमाचे नियोजन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बापूसाहेब द. भाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले आहे. रावे समन्वयक प्रा. एस. बी. सातपुते, प्रोग्राम ऑफिसर डॉ. एस. डी. आहेर आणि प्रा. आर. डी. दरेकर हे विद्यार्थ्यांना वेळोवेळी तांत्रिक मार्गदर्शन करीत आहेत.

२६ नोव्हेंबर संविधान गौरव दिनानिमित्त देशव्यापी जनजागृती अभियान

मतदान विकू नका, भ्रष्टाचाराला पाठिंबा देऊ नका! : राष्ट्रीय संत हवा मल्लिनाथ महाराज

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

तालुका प्रतिनिधी, अक्कलकोट : भारतीय संविधानातील न्याय, स्वातंत्र्य, समता आणि बंधुता या मूलभूत मूल्यांचे महत्त्व नागरिकांपर्यंत पोहोचविण्यासाठी तसेच संविधानाबाबत सामाजिक जागरूकता निर्माण करण्यासाठी २६ नोव्हेंबर संविधान गौरव दिनानिमित्त देशव्यापी जनजागृती अभियान राबविण्याचे आवाहन जय भारत माता सेवा समिती (रजि.), नवी दिल्लीचे राष्ट्रीय संस्थापक अध्यक्ष तथा राष्ट्रीय संत परमपूज्य हवा मल्लिनाथ महाराज यांनी केले आहे.



संविधान हे भारतीय लोकशाहीचा आत्मा असून त्यातील मूल्यांचे संरक्षण करणे ही केवळ शासनाचीच नव्हे, तर प्रत्येक नागरिकाची सामूहिक जबाबदारी आहे. प्रत्येकाने आपल्या अधिकारांसोबतच कर्तव्यांचीही जाणीव ठेवली पाहिजे, असे महाराज यांनी आपल्या संदेशात म्हटले आहे.

या अभियानांतर्गत घराघरांत, मंदिर परिसरात, गावातील चौकात आणि सार्वजनिक ठिकाणी नागरिकांनी स्वतःहून जनजागृती करावी. कुटुंबीयांनी एकत्रितपणे संविधानाच्या उद्देशिकेचे वाचन करावे, मुलांना संविधानातील मूलभूत मूल्यांची माहिती द्यावी, तसेच तरुण आणि ज्येष्ठ नागरिकांनी सामाजिक एकता व राष्ट्रीय एकात्मतेचा संदेश द्यावा, असे आवाहन त्यांनी केले आहे.

'मतदानाचा अधिकार विकू नका, पैशाच्या किंवा कोणत्याही प्रलोभनाच्या आमिषाला बळी पडू नका. भ्रष्टाचाराला विरोध करा आणि भ्रष्ट प्रवृत्तींना पाठिंबा देऊ नका,' असे स्पष्ट आवाहन राष्ट्रीय संत हवा मल्लिनाथ महाराज यांनी केले आहे. मतदान हा लोकशाहीचा कणा असून त्याचा निर्भयपणे आणि विवेकाने वापर करणे आवश्यक असल्याचेही त्यांनी नमूद केले.

जात, धर्म, भाषा आणि प्रादेशिकतेच्या नावाखाली समाजात फूट पाडणाऱ्या प्रवृत्तींपासून दूर राहून सामाजिक सलोखा, बंधुभाव आणि राष्ट्रीय एकात्मता जपण्याचे आवाहनही या अभियानातून करण्यात आले आहे. तसेच संविधानाचा गैरवापर, खोटा प्रचार आणि नागरिकांच्या अधिकारांचे उल्लंघन याबाबत जागरूक राहण्याचे आवाहन परमपूज्य हवा मल्लिनाथ महाराज यांनी केले आहे.

'आम्ही मतदान विकणार नाही, भ्रष्टाचाराला पाठिंबा देणार नाही आणि संविधानाच्या मूल्यांच्या रक्षणासाठी सदैव जागरूक राहू,' अशी सामूहिक प्रतिज्ञा नागरिकांनी घ्यावी. संविधानाचे रक्षण ही प्रत्येक भारतीयाची जबाबदारी असून या अभियानात सर्वांनी सक्रिय सहभाग नोंदवावा.

– राष्ट्रीय संत परमपूज्य हवा मल्लिनाथ महाराज
राष्ट्रीय संस्थापक अध्यक्ष,
जय भारत माता सेवा समिती, नवी दिल्ली.

कार्तिकी यात्रेसाठी पंढरपूर नगरपरिषदेची सर्व यंत्रणा सज्ज

स्वच्छता, पाणीपुरवठा, आरोग्य व आपत्ती व्यवस्थापनासाठी व्यापक नियोजन; १ हजार ५० स्वच्छता कर्मचारी तैनात

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

पंढरपूर : कार्तिकी यात्रा २०२६ च्या अनुषंगाने पंढरपूर येथे येणाऱ्या लाखो वारकरी व भाविकांना आवश्यक नागरी सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी पंढरपूर नगरपरिषदेच्या वतीने सर्वंकष नियोजन करण्यात आले आहे. यात्रा कालावधीत शहरासह चंद्रभागा नदीपात्र, वाळवंट, ६५ एकर भक्तिसागर आणि पत्राशेड परिसरात स्वच्छता, पाणीपुरवठा, सार्वजनिक शौचालये, प्रकाशव्यवस्था तसेच आपत्ती व्यवस्थापनाची यंत्रणा सज्ज ठेवण्यात आली असल्याची माहिती मुख्याधिकारी महेश रोकडे यांनी दिली.

स्वच्छता व्यवस्थेसाठी १ हजार ५० कर्मचारी नियुक्त

यात्रा कालावधीत शहर स्वच्छ ठेवण्यासाठी नगरपरिषदेचे ३५० कायमस्वरूपी व ७०० ठेक्यावरील असे एकूण १ हजार ५० कर्मचारी कार्यरत राहणार आहेत. दररोज निर्माण होणाऱ्या १२० ते १५० टन कचऱ्याचे संकलन व वाहतूक करण्यासाठी ४१ घंटागाड्या, ६ कचरा वाहने, टिपर व ट्रॅक्टरची व्यवस्था करण्यात आली आहे. ही यंत्रणा दोन सत्रांत कार्यरत राहणार आहे. सार्वजनिक शौचालयांच्या स्वच्छतेसाठी तीन पाळ्यांमध्ये कर्मचारी नियुक्त करण्यात आले असून सक्शन व्हॅक्युम मशिन्स, जेटिंग मशिन्स व कल्चर फवारणी यंत्रणाही उपलब्ध करण्यात आली आहे.

भाविकांच्या सुविधेसाठी शहरात सुलभ शौचालयांची २ हजार ६२ आसने, नगरपरिषदेची ८४ आसने, तीर्थक्षेत्र विकास आराखड्यांतर्गत १३६ आसने आणि रेल्वे विभागाची १५ आसने उपलब्ध आहेत. याशिवाय ७० सार्वजनिक मुतारींची व्यवस्था करण्यात आली आहे. ६५ एकर परिसरात १ हजार ३८० कायम स्वरूपी शौचालये असून नदीपात्र, पत्राशेड व ६५ एकर परिसरात तात्पुरती प्री-फॅब्रिकेटेड शौचालये उभारण्यात आली आहेत.

पिण्याच्या पाण्यासाठी २४ तास व्यवस्था

६५ एकर परिसरातील १५ लाख लिटर क्षमतेच्या पाण्याच्या टाकीतून २४ तास पाणीपुरवठा करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. तसेच पिण्याचे व वापराचे पाणी उपलब्ध होण्यासाठी शहरातील प्रमुख ठिकाणी पाण्याचे टँकर राखीव ठेवण्यात येणार आहेत.

आपत्ती व्यवस्थापनासाठी स्वतंत्र केंद्रे

यात्रेदरम्यान उद्भवणाऱ्या आपत्कालीन परिस्थितीचा तत्काळ सामना करण्यासाठी ६५ एकर, चंद्रभागा नदीपात्र वाळवंट, पत्राशेड, तुकाराम भवन आणि नगरपरिषद कार्यालय येथे आपत्कालीन व्यवस्थापन केंद्रे (एजउ) स्थापन करण्यात आली आहेत.

अग्निशमन व्यवस्थेसाठी नगरपरिषदेची तीन अग्निशमन वाहने सज्ज ठेवण्यात आली आहेत. याशिवाय सोलापूर महानगरपालिका तसेच बार्शी, करमाळा, मंगळवेढा, कुर्डुवाडी व सांगोला नगरपरिषदांची अग्निशमन वाहनेही उपलब्ध करून घेण्यात आली आहेत. चंद्रभागा नदीपात्रात यांत्रिकी रबर बोटींसह प्रशिक्षित जीवरक्षकांची नियुक्ती करण्यात येणार आहे.

प्रकाशव्यवस्था व अतिक्रमण निर्मूलनावर विशेष लक्ष

यात्रा कालावधीत शहरातील पथदिवे सुरळीत सुरू राहावेत, यासाठी देखभाल व दुरुस्तीची कामे पूर्ण करण्यात आली आहेत. गर्दीच्या प्रमुख ठिकाणी अतिरिक्त प्रकाशव्यवस्था व विद्युत रोषणाई करण्यात आली आहे.

जिल्हा प्रशासनाच्या माध्यमातून जिल्ह्यातील अन्य नगरपरिषदांमधील अधिकारी व कर्मचारी उपलब्ध करून देण्यात आले आहेत. त्यांच्या सहकार्याने शहरातील अतिक्रमण निर्मूलन, चंद्रभागा वाळवंट व ६५ एकर परिसरातील स्वच्छता आदी कामे करण्यात येत आहेत.

कार्तिकी यात्रा कालावधीत भाविकांना स्वच्छ, सुरक्षित व आरोग्यदायी वातावरणात आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी नगरपरिषद प्रशासनाकडून विविध विभागांच्या समन्वयाने कार्यवाही करण्यात येत आहे. यात्रा सुरळीत पार पाडण्यासाठी भाविक व नागरिकांनी स्वच्छता राखून नगरपरिषद प्रशासनास सहकार्य करावे, असे आवाहन नगरपरिषद प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे. असेही मुख्याधिकारी श्री रोकडे यांनी सांगितले.

गरजूंच्या चेहऱ्यावर फुलला दिवाळीचा आनंद!

निफाडमध्ये 'आनंदाचा शिधा' घेण्यासाठी गोरगरिबांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

निफाड/प्रतिनिधी : दिवाळीचा सण म्हणजे आनंद, उत्साह आणि आपुलकीचा उत्सव! समाजातील प्रत्येक घटकाला या आनंदात सहभागी होता यावे, या उदात्त सामाजिक भावनेतून निफाड शहरात गोरगरीब, गरजू व वंचित बांधवांसाठी 'आनंदाचा शिधा' वाटप उपक्रमाचे आयोजन निफाड नगरपंचायत च्या आवारात करण्यात आले होते.

उपमुख्यमंत्री ना. एकनाथजी शिंदे यांच्या संकल्पनेतून आयोजित हा सामाजिक उपक्रम बुधवार, दि. १८ नोव्हेंबर २०२६ रोजी सकाळी साडेनऊ वाजता



निफाड नगरपंचायतीच्या आवारात माजी नगराध्यक्ष राजाभाऊ शेलार, उपनगराध्यक्ष अनिल पा. कुंदे ,नगरसेवक संदीप जेऊघाले ,साहेबराव बर्डे, देवदत्त कापसे ,तसेच नगरसेविका अरुंधती पवार नयना निकाळे ,अलका निकम, यांचे उपस्थितीतआनंदाचा शिधा चे वाटप करण्यात आले.

आर्थिक परिस्थितीमुळे सणासुदीचा आनंद साजरा करताना अनेक कुटुंबांना अडचणींचा सामना करावा लागतो. अशा कुटुंबांच्या जीवनातही दिवाळीचा आनंद फुलावा, त्यांच्या घरात सणाचा गोडवा निर्माण व्हावा आणि कोणतेही गरजू कुटुंब आनंदापासून वंचित राहू नये, या भावनेतून हा उपक्रम राबविण्यात आला. प्रत्येक गरजवंत व्यक्तीला हा शिधा मिळाल्याने त्यांच्या चेहऱ्यावर समाधान ओसंडूनवाहत होते , कोणीही या आनंदाच्या शिध्यापासून वंचित राहू नये म्हणून काळजी घेतली जात होती. या वेळी हरीश कर्डिले, आसिफ पठाण, सुनील निकाळे, राजाभाऊ निकम, नंदूभाऊ कापसे, तसेच इतर नागरिक व निफाड नगर पंचायतीचे कर्मचारी पदाधिकारी उपस्थित होते.

महाराष्ट्राचे लाडके उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे यांचे संकल्पनेतून गोरगरीब जनतेसाठी दीपावलीनिमित्त जो आनंदाचा वाटप केला जात आहे त्याला जनतेने उत्स्फूर्त प्रतिसाद दिला जनतेची नाळ असणारा नेता चांद्यापासून ते बांध्यापर्यंत जनतेच्या समस्यांची जाणीव असणारा नेता म्हणजे एकनाथजी शिंदे आहे विकासाच्या दृष्टीने जेही काम आम्ही साहेबांपर्यंत घेऊन गेलो त्याला साहेबांनी न्याय दिला, गरिबांच्या शेतकऱ्यांच्या बाबतीत दुष्काळी परिस्थितीची जाणीव ठेवून हा आनंदाचा शिधा वाटपाचे महत्त्वाचे काम त्यांनी केले महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री शिंदे साहेब यांचे पाठीशी जनतेचे आशिर्वाद सदैव राहील यात शंका नाही

– अनिल पा कुंदे
शिवसेना तालुका अध्यक्ष तथा
उपनगराध्यक्ष निफाड

कार्तिक यात्रेत वारकऱ्यांना दर्जेदार आरोग्य सुविधा द्या;

आरोग्य यंत्रणेला सभापती चेतन सिंह केदार सावंत यांचे निर्देश

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क



सोलापूर : बघा मी कार्तिकी एकादशी वारी २० २६ या पार्श्वभूमीवर जिल्ह्यातील आरोग्य यंत्रणे सज्ज राहून वारकऱ्यांना सुख सुविधा पुरवणीचे आरोग्य सुविधा उपलब्ध करून द्याव्यात. वारी काळा त कोणतीही कमतरता पडू नये यासाठी अशोक आरोग्य समितीचे सभापती चेतस हे केदार सावंत यांनी दिली आहे.

जिल्हा परिषद सोलापूर येथे चेतन सिंह केदार यांच्या अध्यक्षतेखाली आरोग्य शिक्षण समितीची मासिक सभा पार पडली. या सभेत जिल्ह्यातील राष्ट्रीय आरोग्य कार्यक्रमाचा अंमलबजावणीचा सविस्तर आढावा घेण्यात आला. जिल्ह्यातील आरोग्य सेवा लोकांनी गुणवत्ता पूर्ण करण्यासाठी सर्व लोकांना सर्व अरगीयंत्रणांना समन्वयने काम करण्याचे आव्हाने त्यांनी केले.

सभेत राष्ट्रीय कुटुंब कल्याण माता व बाल आरोग्य कुष्ठरोगी निर्माण क्षयरोगी हिवताप हत्तीरोग नियंत्रण कार्यक्रमाचा आढावा घेण्यात आला. यासाठी औषधासाठी औषधी प वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या नियुक्ती, एनआर एच एम कर्मचाऱ्यांचे प्रश्न जन आरोग्य समिती सदस्यांची निवड तसेच शासनाच्या विविध योजना अंमलबजावणी बाबत करण्यात आली.

जन आरोग्य संवाद यात्रेद्वारे जन आरोग्य पिंपळनेर त्यांनी केलेल्या कामाचे उत्कृष्ट राज्याचे आरोग्य मंत्री प्रकाश आंबेडकर यांनी प्रशंसा केली होती या उल्लेखनीय कामाची दखल घेत. आरोग्य समितीच्या सभेत ठराव मंजूर करून सदस्यांनी टाळ्यांच्या गजरात पिंपळ प्राथमिक आरोग्य केंद्राची अभिनंदन केली तसेच बार्शी तालुक्यात बोगस डॉक्टर विरोधात मोहीम राबवल्याबद्दल मोहिमेचे सदस्यांनी कौतुक केले.

ब रुग्णांना आरोग्यासाठी प्राथमिक आरोग्य केंद्रात जावे लागते खाजगी रुग्णालयाचा आधार घ्यावा लागू नये यासाठी, शासकीय आरोग्य संस्थांनी दर्जेदार आरोग्य सुविधा पुरवणे आवश्यक आहे जिल्ह्यातील कोणत्याही प्राथमिक आरोग्य केंद्रात व आरोग्य केंद्रात औषधाचा तुटवडा जाणवता कामा नये, औषधे उपलब्ध बाबत समितीने दक्षता घ्यावी अशी निर्देश केदार सावंत यांनी दिले. तसेच लसीकरणाची आरोग्य केंद्र व उपकेंद्र आकडेवारी पुढील सभेत सादर करण्याची या देशी त्यांनी दिले.

ा सभेत सोनाली कडते, संदीप अमोल टेळे, नागनाथ पांडुरंग भोसले, सविता संजय कोकाटे जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ सतीश पोकरवाड गोपाळ शिंदे सर्व तालुका आरोग्य अधिकारी उपस्थित होते.

पंढरपूर नगरपरिषदेला अत्याधुनिक सफाई मशीन; शहर स्वच्छतेला मिळणार गती



महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथराव शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली पंढरपूर नगरपरिषदेला आधुनिक तांत्रिक सफाई मशीन उपलब्ध

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

पंढरपूर : पंढरपूर शहरातील स्वच्छता व्यवस्था आधुनिक कार्यक्षम आणि आधुनिक करण्याच्या दृष्टीने पंढरपूर नगर परिषदेला अत्याधुनिक यांत्रिक सफाई मशीन उपलब्ध करून देण्यात आले आहे.

महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री मा.ना. एकनाथजी शिंदे साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली ही आधुनिक मशीन नगरपरिषदेला प्रधान करण्यात आले आहे.

या आधुनिक मशीन मुळे शहरातील रस्ते व बाजारपेठ, सार्वजनिक परिसर तसेच विविध नागरी भागातील स्वच्छता मोहीम ला अधिक गती मिळणार आहे. पंढरपूर हे महाराष्ट्रातील तीर्थक्षेत्र महत्त्वाचे असून वर्षभर येथे भाविकांची मोठ्या प्रमाणात वर्दळ असते. विशेषता आषाढी आणि कार्तिक यात्रेच्या काळात शहरातील स्वच्छता व नागरी सुविधांचे व्यवस्थापन महत्त्वाची ठरते. अशाच परिस्थितीत आधुनिक यांत्रिकी सफाई मशीन ची उपलब्धता व्यवस्थापनासाठी मोठी मदत होणार आहे.

यावेळी जिल्हाधिकारी कीर्तीकियन, लोकनियुक्त नगराध्यक्ष डॉक्टर सौ प्रणिता भालके, आमदार अभिजीत पाटील, आमदार राजू खरे, नगरसेवक ओंकार जोशी, व शिवसेनेचे जिल्ह्यातील नेते मंडळी ही मोठ्या संख्येने उपस्थित होते.

माझा खंदा सहकारी गेला; रिपब्लिकन चळवळीचे मोठे नुकसान झाले : खा.रामदास आठवले

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

प्रतिनिधी बाळासाहेब अहिरे/उल्हासनगर : दिनांक १७/११/२०२६ रोजी उल्हासनगर शहर जिल्ह्याच्या वतीने दिवंगत पँथर नेते सुरेश बारसिंग यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

याप्रसंगी रिपब्लीकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष व केंद्रीय समाज कल्याण मंत्री रामदास आठवले उपस्थित होते.

याप्रसंगी आठवले भाऊक होऊन म्हणाले'माझा चाळीस वर्षांपासून सतत सावलीसारखा



असलेला सहकारी गेल्यामुळे पक्षाची मोठी हानी झाली आहे,त्याने संपूर्ण महाराष्ट्रात पक्ष वाढीसाठी अथक प्रयत्न केले, अतिशय शांत स्वभावाचा होता पण त्याची उंची आणि धिप्पाड शरीरयष्टीमुळे तो माझा अंगरक्षक आहे असे लोकांना वाटायचे, तो आमच्या पक्षाचा संरक्षण प्रमुख होता, त्याने खऱ्या अर्थाने नेत्यांचे आणि समाजाचे संरक्षण केले.अनेक ठिकाणी त्याच्यासाठी शोकसभा सुरू आहेत.तो काही वर्ष उल्हासनगरमधील सुभाष टेकडी येथे राहत होता.त्यामुळे उल्हासनगरमधील शोकसभा ही अत्यंत महत्वाची आहे.

उल्हासनगर शहर जिल्ह्याच्या वतीने सभेचे आयोजन करण्यात आले होते.शहर जिल्हा अध्यक्ष नाना बागुल यांच्या अध्यक्षतेखाली सभा झाली,प्रास्ताविक माजी नगरसेवक शांताराम निकम यांनी केले तर सूत्र संचालन गंगाधर मोहोड यांनी केले.

प्रसंगी टाऊन हॉल खचून भरला होता, पक्षाचे नेते सुरेश सावंत, गौतम सोनवणे, दयाल बहादूरे, अण्णा रोकडे, आमदार कुमार आईलानी, माजी आमदार पप्पू कलानी, महापौर अश्विनी निकम, नाना पवार, शिवसेना नेते अरुण अशान, कमलेश निकम, मनोज लासी, ऍड राजय गायकवाड, भास्कर वाघमारे, महेंद्र गायकवाड, प्रा.डॉ.विठ्ठल शिंदे, राहुल हंडोरे, प्रल्हाद जाधव, माजी नगरसेविका लता शांताराम निकम, मध्यवर्ती रुग्णालयाचे डॉ.मनोहर बनसोडे ,ठाणे ग्रामीण अध्यक्ष बाळाराम भालेराव, गांगुर्डे ताई,संग्राम मोरे, भीमराव डोळस,संजय जाधव, रामेश्वर गवई,प्रफुल्ल केदारे, राजू रणदिवे, रमेश बर्वे उपस्थित होते

कार्यक्रमाचे आयोजन महासचिव सुनील सोनवणे, महिला अध्यक्षा सिद्धीका पाटील, युवक अध्यक्ष संदीप गायकवाड, अविनाश अहिरे, मधुकर बिऱ्हाडे, भगवान खरे, चंदू केदारे, तुकाराम सोनवणे,बापू सोनवणे, भाऊसाहेब चंदनशिव, मीना बाविस्कर, संगीता मोरे, शोभा तुपेरे, संगीता राजगुरू, संगीता बाविस्कर व शहरजिल्हा कमिटीने केले.

कार्यक्रमास महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.सभेच्या सुरुवातीला प्रसिद्ध गायिका निशा भगत यांनी श्रद्धांजलीपर गीते सादर केली.

कवींनी कवितांतून मांडल्या बळीराजाच्या व्यथा; दुष्काळ, कर्जबाजारीपणा आणि शेतीच्या संघर्षाला शब्दरूप

शेतकऱ्यांच्या बांधावर रंगले 'बळीराजाच्या कविता' कविसंमेलन

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क



कळंब/प्रतिनिधी: शेतकऱ्यांच्या व्यथा, दुष्काळाची भयावह परिस्थिती, कर्जबाजारीपणा आणि शेतीतील संघर्ष अनुभवता यावा, या उद्देशाने कळंब तालुका पत्रकार संघ व कळंब साहित्य संस्कृती ग्रुप यांच्या संयुक्त विद्यमाने 'बळीराजाच्या कविता' या विशेष कविसंमेलनाचे आयोजन हसेगाव (ता. कळंब) येथील एका शेतकऱ्याच्या बांधावर करण्यात आले. या अनोख्या कविसंमेलनात कवींनी आपल्या कवितांतून बळीराजाच्या वेदना, संघर्ष आणि जगण्याची जिद्द प्रभावीपणे मांडली.

कविसंमेलनाच्या अध्यक्षस्थानी शेतीमातीचे कवी अनिल गव्हाणे होते, तर उद्घाटक म्हणून ह.भ.प. महादेव महाराज अडसूळ उपस्थित होते. प्रमुख उपस्थितीत मुख्याध्यापक राजेंद्र बिक्कड, पत्रकार संघाचे विश्वस्त सतीश टोणगे, अध्यक्ष अशोक शिंदे आणि मुख्याध्यापक बालाजी जाधवर यांची उपस्थिती होती. प्रारंभी महादेव महाराज अडसूळ यांच्या हस्ते वृक्षपूजन करण्यात आले.

मळेगाव (ता. बार्शी) येथील बालकवयित्री दिव्या गायकवाड हिने शेतकऱ्याच्या कष्टमय जीवनाचे चित्रण केले. संध्याराणी कोल्हे यांनी कर्जाच्या ओझ्याखाली दबलेल्या शेतकऱ्याची व्यथा मांडली, तर बहुला येथील संतोष यादव यांनी 'शेतकरी आहोत आम्ही, तुमचे गुलाम नाही,' अशा परखड शब्दांत शेतकऱ्यांच्या स्वाभिमानाचा आवाज बुलंद केला.

संतोष लिमकर यांनी शेती तोट्यात जाऊनही पुढील हंगामाच्या आशेने तयारी करणाऱ्या शेतकऱ्याची जिद्द मांडली. खाम सवाडी येथील सुदर्शन जोशी यांनी सत्ताधाऱ्यांना उद्देशून, 'साहेब एसीत बसून भाषण नको, जरा बांधावर या,

डोळ्यांदेखत मरण पाहणं, जरा अनुभव घ्या.'

या ओळींतून व्यवस्थेला जाब विचारला. तसेच 'पाणी डोळ्यातलं सावरू आम्ही, पण वावराचं काय?' या प्रश्नातून शेतीसमोरील पाणीटंचाईचे वास्तव मांडले.

युवा कवी सागर धेंडूळे यांनी दुष्काळ आणि कर्जाच्या संकटाचे चित्रण केले. गझलकार शेखर गिरी यांनी शेतकऱ्याने पिकांसोबत घामही पेरला असल्याचा आशय मांडला. शाम जाधवर यांनी संकटातील शेतकऱ्याला मदतीचा हात देण्याचे आवाहन केले. आशा राऊत यांनी काळ्या मातीशी असलेले शेतकऱ्याचे नाते कवितेतून उलगडले, तर बालकवी अश्रुबा कोठावळे यांनी शेतकरी बापाच्या कष्टांचे वास्तव शब्दबद्ध केले.

उद्घाटक महादेव महाराज अडसूळ यांनी अभंगातून शेतकऱ्याप्रती कृतज्ञता व्यक्त केली. अध्यक्षीय भाषणात अनिल गव्हाणे यांनी दुष्काळग्रस्त शेतकऱ्याच्या संसाराचे विदारक चित्र मांडणाऱ्या कवितेतून उपस्थितांना भावूक केले. यावेळी मुख्याध्यापक राजेंद्र बिक्कड यांनी दुष्काळामुळे शेतकरी मोठ्या संकटात असून अशा साहित्यिक उपक्रमांतून बळीराजाच्या दुःखाला वाचा फुटत असल्याचे सांगितले.

कविसंमेलनाचे सूत्रसंचालन कवयित्री आशा राऊत यांनी केले, तर पत्रकार संघाचे अध्यक्ष अशोक शिंदे यांनी आभार मानले. या अनोख्या कविसंमेलनाला परिसरातील कवी, साहित्यिक आणि रसिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.